क्र.साप्रवि/रवका/गणवेष/न.क्र.७८१/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
**मुंबई - ४०० ०१९.**

**महावितरण**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

# प्रशासकीय परिपत्रक क्र. १६४ दिनांक ०८ / ०८ / २००८

विषय : दक्षता व सुरक्षा संवर्गातील अधिकाऱ्यांच्या गणवेषाचा शिलाई दर, धुलाई भत्ता तसेच चामडी बुटाच्या व वुलन जर्सीच्या दरामध्ये वाढ करणेबाबत.

संदर्भ : सर्वसाधारण आदेश क्र.१३० दिनांक ०५.०२.१९९३

......

सर्वसाधारण आदेश क्र.१३० दिनांक ०५.०२.१९९३ अनुसार दक्षता व सुरक्षा संवर्गातील अधिकाऱ्यांना दिल्या जाणाऱ्या गणवेषाचा शिलाई दर, धुलाई भत्ता तसेच चामडी बुटाच्या व वुलन जर्सीच्या दरामध्ये वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव कंपनीच्या विचाराधीन होता.

२. या अनुषंगाने प्रशासकीय परिपत्रक क्र.१ दि.२९.०९.२००५ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार मा.व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (संचलन) व संचालक (वित्त) यांच्याशी विचारविनिमय करून दक्षता व सुरक्षा संवर्गातील अधिकाऱ्यांच्या गणवेष शिलाईचे दर, धुलाई भत्ता तसेच चामडी बुटाच्या व वुलन जर्सीच्या दरामध्ये वाढ करण्याबाबत खालील तक्त्यातील रकाना क्र. ४ व ५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सुधारित करण्यास मान्यता दिली आहे.

| अनु. क्रमांक | **सध्याचे प्रचलीत दर** | | **सुधारणा करण्यात आलेले दर** | |
|---|---|---|---|---|
| | सवलतीचा प्रकार | रक्कम रुपये | सवलतीचा प्रकार | रक्कम रुपये |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | गणवेष शिलाई खर्च | ३००/- (२ जोडी गणवेषासाठी २ वर्षासाठी) | गणवेष शिलाई खर्च | ५००/- (२ जोडी गणवेषासाठी २ वर्षासाठी) |
| २. | गणवेष धुलाई भत्ता | ३०/- (दरमहा) | गणवेष धुलाई भत्ता | ५०/- (दरमहा) |
| ३. | चामडी बुट | ५४४/- (प्रतिवर्षी प्रति जोडी) | चामडी बुट | ८००/- (प्रतिवर्षी प्रति जोडी) |
| ४. | वुलन जर्सी | २२५/- (२ वर्षासाठी) | वुलन जर्सी | ३००/- (२ वर्षासाठी) |

३. उपरोक्त तक्त्यात नमूद कलेले गणवेष शिलाईचे दर, धुलाई भत्ता तसेच चामडी बुटाचे व वुलन जर्सीचे दर हे प्रशासकीय परिपत्रक जारी केलेल्या दिनांकापासून अंमलात येतील.

४. सदर प्रशासकीय परिपत्रक म.रा.वि. वितरण कं. मर्यादितच्या www.mahadiscom.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

*( सु.य.पाटील )*
*मुख्य महाव्यवस्थापक (क)*

प्रत :
म.रा.वि.वितरण कंपनी मर्यादितच्या विभागीय कार्यालय व त्यावरील सर्व स्तरापर्यंत.

*K/Adm.Cir.- Uniform*
*07/08/2008*